# University of Mumbai

Phone - 022 – 2265 2816
E-mail - *dy.registrar.tau@fort.mu.ac.in*

**Academic Appointments & Qaulity Insurance (AAQA)**
UNIVERSITY of MUMBAI,
Fort Campus, M.G. Road, Mumbai - 32

एएक्युए/आयसीडी/२०२०–२०२१/०३

परिपत्रकः—

विद्यापीठाच्या विविध विभाग/संस्थाचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे व कल्याण उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, आंबडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र यांना कळविण्यात येते की, या विभागाचे परिपत्रक क्र. शिनिमावि(विशि)/आयसीडी/२०१८–१९/९८३ दिनांक २७ नोव्हेंबर, २०१८ अन्वये सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई यांच्याकडून शिक्षकांच्या वेतननिश्चितीस मान्यता घेण्याकरीता संबंधित शिक्षकांनी त्यांची पी.एच.डी. पदवी तसेच नेट/सेट प्रमाणपत्रांची संबंधित विद्यापीठाकडून पडताळणी करून पडताळणी प्रमाणपत्र सादर करावे असे कळविण्यात आले होते. परंतु काही शिक्षकांनी अद्यापपर्यंत पी.एच.डी. पडताळणी प्रमाणपत्र या विभागास सादर केलेले नाही.

तरी उपरोक्त बाब सर्व संबंधीत शिक्षकांच्या निदर्शनास आणून द्यावी व सर्व संबंधितांनी त्यांचे पी.एच.डी. पडताळणी प्रमाणपत्र शिक्षक नियुक्ती व मान्यता विभागास (AAQA) तातडीने सादर करण्यात यावे जेणेकरून वेतन निश्चितीचे काम करण्याबाबतचे प्रस्ताव सहसंचालक कार्यालयात पाठविण्यात येतील. अन्यथा सर्वस्वी जबाबदारी संबंधीत शिक्षकांची राहील, याची कृपया नोंद घ्यावी.

मुंबई : ४०० ०३२
२७ जानेवारी, २०२१

(डॉ. बळीराम गायकवाड)
प्रभारी कुलसचिव

प्रति,

विद्यापीठाच्या विविध विभाग/संस्थाचे संचालक/विभागप्रमुख, प्राचार्य, सर ज. जी वास्तुशास्त्र महाविद्यालय, समन्वयक, रत्नागिरी/ठाणे व कल्याण उपकेंद्र, विश्वभूषण भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, आंबडवे, विजयालक्ष्मी विश्वनाथ दळवी महाविद्यालय, तळेरे, प्रभारी संचालक, ज्ञानस्त्रोत केंद्र.